क्रमांकः- 2595/09
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला,
८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई ४०० ०१८.

दिनांकः- 14 MAY 2009

विषयः- माहितीचा अधिकार २००५ अन्वये प्राप्त झालेल्या टपालाचा त्वरीत निपटारा करणेबाबत.

**परिपत्रक** क्र.३५० दि.८/५/२००९

असे निदर्शनास आले आहे की, राज्य माहिती आयोग यांचेकडील या कार्यालयास प्राप्त झालेल्या माहिती अधिकारान्वये अपिलातील नोटीसा, तसेच माहिती अधिकारातील अर्ज टपालाव्दारे प्राप्त होतात. परंतु त्यांचे वाटप विहित वेळेत करण्यात येत नाही. संबंधीतांना टपाल विहित वेळेत प्राप्त न झाल्याने त्यांना आयोगासमोर सुनावणीकरीता तारखेच्या दिवशी उपस्थित रहता येत नाही. तसेच विहित मुदतीत अर्जदारास माहिती सादर करता येत नाही.

सुनावणीस उपस्थित न राहिल्यास, तसेच माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जावर विहित वेळेत कार्यवाही न झाल्यास, सदर कायदयात दंडात्मक तरतूद करण्यात आलेली आहे. याबाबत वेळोवेळी माहिती देऊन देखील कर्मचाऱ्यांकडून हलगर्जीपणा झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी संबंधीत सर्व कार्यालयीन कर्मचाऱ्यांना ताकीद देण्यात येते की, माहितीचा अधिकार २००५ अन्वये अर्ज, अपीलातील नोटीसा यांचे वाटप त्याच दिवशी संबंधीतांना करण्यात यावे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही झाली नसल्यास संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतची तरतूद आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत आलेल्या अर्जावर त्वरीत कार्यवाही करुन कायदयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. अशा सुचना सर्व संबंधीतांना या परिपत्रकाव्दारे देण्यात येत आहेत.

धर्मादाय आयुक्त, (प्र.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.